**अतिरिक्त प्रवेश फेरीसंबंधी महत्वाच्या सूचना.**

१. शासनमान्य प्रवेश नियमावलीनुसार अतिरिक्त प्रवेश फेरींसाठी संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी **प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट** असलेले सर्व उमेदवार प्रवेशासाठी पात्र असतील.
२. अतिरिक्त प्रवेश फेरीसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय, शासन अनुदानीत ,विद्यापीठ विभाग व विद्यापीठ संचलित संस्थामधील अभ्यासक्रमनिहाय रिक्त जागांची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
३. अतिरिक्त फेरीमध्ये भाग घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने विकल्प अर्ज Registered Cndidates Login मधून भरणे आवश्यक आहे.
४. अतिरिक्त प्रवेश फेरीमध्ये जागेचे वाटप झाल्यास अशा उमेदवारांचा त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला शासकीय, शासन अनुदानीत ,विद्यापीठ विभाग व विद्यापीठ संचलित संस्थामधील प्रवेश आपोआप रद्द होईल व अशा रद्द झालेल्या जागेवर उमेदवाराचा कोणत्याही प्रकारे हक्क असणार नाही.
५. अतिरिक्त प्रवेश फेरीमध्ये जागेचे वाटप झालेल्या उमेदवारास त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला प्रवेश विनाअनुदानीत संस्थेतील असेल तर अशा विनाअनुदानीत संस्थेतील प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही उमेदवाराने स्वत: करणे आवश्यक आहे.
६. अतिरिक्त प्रवेश फेरीमध्ये प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी विहीत मुदतीमध्ये जागेचे वाटप झालेल्या संस्थेमध्ये प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.विहित मुदतीनंतर सदरच्या जागेवर प्रवेशास उमेदवार पात्र असणार नाही.